# राजर्षी शाहू महाराज व महिला सक्षमीकरण

**डॉ. मनिषा यादव** श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूर, जि. अकोला

महिलांचे शिक्षण व शिक्षणातून महिलांचे सक्षमीकरण तसेच स्त्री जातीच्या संरक्षणाचे विविध कायदे प्रत्यक्षस्वरुपात राबवणारे राजर्षी शाहू महाराज याचे कार्य स्वातंत्र्यपूर्व काळात ही भविष्यवेधी असलेले दिसून येते राजर्षी शाहू महाराज यांचे स्त्रीविषयक कार्य असो की, अस्पृश्योध्दार, भटक्या विमुक्त जातीचा उध्दार, जातीभेदाशी मुकाबला, मुस्लिम समाजाविषयक उत्कमणशील विचार या सर्वाचा सांगोपाग विचार केली असता सर S.M. फ्रेझरच्या भाषेत शाहू महाराजाचे शिक्षक तसेच ब्रिटिश प्रशासनातील कर्तबदार प्रशासकीय अधिकारी म्हणतात कळी His hinest Sir shahu chatrapati maharaja एक लोकत्तर पुरुष तर डॉ भिमराव आंबेडकर म्हणतात, त्यांच्यासारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हांस शंका आहे.

2) यावरून त्याच्या कार्याची अनुभूती येते आपल्या प्रजेचा पितृप्रमाणे संभाळ करणारा कुशल प्रशासक, सामाजिक न्यायाकरिता आयुष्य वेचणारा महापुरुष राजर्षी शाहू महाराजांचे काम काहि मोजक्या शब्दांत मांडणे केवळ अशक्य, तरीही त्यांच्या महिला शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचार हा भारतीय संविधानच्या माध्यमातून प्रत्यक्षात आला पण भारतीय संविधान निर्माण होण्याच्याही आधी राजर्षी. शाहू महाराजाच्या संविधानाने महिला सक्षमीकरण घडवून आणले हे त्रीकालातील सत्य आहे. शाहू महाराजांनी महिला सक्षमीकरणाची सुरुवात आपल्या घरातून केलेली दिसते विधवा सून इंदुमती यांना शिक्षण देऊन त्यांना सामाजिक, राजकीय क्षेत्रात सर्वोत्तम व्यक्ती म्हणून जे काही करता येईल ते त्यांनी केलेले दिसते. त्यांनी बालविवाह, विधवापध्दती ही केवळ शिक्षणाचा अभाव व यातून बाहेर पडायचे असेल तर शिक्षण हाच एक उपाय असे सांगीतले दिसते– स्त्रीयांना गृहशास्त्र व बालसंगोपनातून मुक्त करून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रीय करण्याचे काम त्यांनी केले कोल्हापूर संस्थानामध्ये मुलिंच्या स्वतंत्र शाळा, मुले व मुली याच्या संयुक्त शाळा, शिक्षकांना 'इनाम', मागासलेल्या जातीच्या स्त्रीयासाठी शिक्षण, शिष्यवृत्या त्यांच्या राहण्याची जबाबदारी करवीर संस्थानात प्राथमिक शिक्षण, विधवा पुनर्विवाह कायदा 1912, आंतरजातीय विवाह कायदा (1919) स्त्रीयांशी क्रूरपणे वागणे प्रतिबंध कायदा (1919) घटस्फोट व वारसा कायदा (1920) देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा इ कार्य केल्याने स्त्रीयांचे शोषण व सतत होणारी पिळवणूक थांबली व स्त्रीयांनाही, सन्मानाने जगता येऊ लगाते हे केवळ राजर्षीमूळे झाल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दीष्ट्यो**

1) राजर्षी शाहू महाराजपूर्वी कालावधीतील स्त्रीयांचा अभ्यास करणे
2) राजर्षी शाहू महाराजांच्या जीवन व कार्याचा अभ्यास करणे.
3) राजर्षी शाहू महाराज यांच्या कारकिर्दीतील स्त्रीशिक्षणविषयक कायद्याचा अभ्यास करणे.
4) राजर्षी शाहू महाराज यांच्या महिला विषयक सामाजिक कायद्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**

1) राजर्षी शाहू महाराज पूर्व कारखंडात महिलांचे शोषण व पिळवणूक होत होती त्यांना कोणतेही स्वातंत्र्य
नव्हते तसेच शिक्षणाचा वारसासंपत्तीच अधिकार नव्हता.
2) राजर्षी शाहू महाराजायांच्या स्त्रीशिक्षणविषयक कायदे निर्मिती मूळे स्त्रियांना शिक्षण मिळाले
3) राजर्षी शाहू महाराजाच्या सामाजिक कायद्यामुळे महिलाचे सक्षमीकरण घडून आले

27 डिंसेबर 1977 रोजी खामगाव येथे झालेल्या भाषणात राजर्षी शाहू महाराज म्हणतात, "शिक्षणाशिवाय कोणालाही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो अज्ञानात बडून गेलेल्या देशात उत्तम मुप्सद्दी क लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत म्हणूनच सक्तीच्या मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. (4) पान क्र (817) यावरुन शाहू महाराजानी शिक्षण मग ते स्त्रीचे असो कि पुरुषाचे याल महत्व दिल्याचे दिसून येते राजर्षी शाहू महाराज पूर्व कालखंडात खालच्या जातीतील लोकांना व स्त्रीयांना शिक्षण नव्हते, परांकोटीची अस्पृश्यता होती खालच्या जातीतील स्त्रीप्रमाणे अस्पृश्याना शिक्षण नाकारले होते वेदमंत्र म्हणण्याचा त्यांना अधिकार नव्हता स्त्री जर शिकली तर शब्दांच्या आल्या होतील तीचा पती मृत्य पावेल अशा अंधश्रध्दा त्या काळात अस्तित्वात होत्या त्यावेळी शाहू महाराजाचे शिक्षण विषयक विचार किती पुरोगामी होते व्यवस्थेला एक नवा आयाम देणारे होते हे दिसून येते सातारच्या महाराजांनाही शिक्षण हे मध्यरात्री व्हावे लागत

होते तिथे सर्वसामान्य लोकांच्या शिक्षणाची काय परिस्थिती असेल याची कल्पना केलेली बरी यावरुन शाहू महाराज यांनी आपल्या प्रजेला शिक्षण देण्याचे घेतलेले व्रत किती कठोर होते हे दिसते कारण बहुतांश समाजव्यवस्थेवर

शिक्षणाची कवाडे खुले करण्यांचे त्यांचे कार्य या वर्गासाठी अमृतासमान होते कारण स्त्री व खालच्या वर्गातील लोक यांची पिळवणूक व शोषण मोठया प्रमाणावर होत होते, वेद म्हणण्याचा अधिकार जो वैदिक काळात स्त्री–पुरुषांना मग तो कोणत्याही जातीत असो त्याला पूढे तो राहिला नाही स्त्रीयांनी व शुद्रांनी वेद वाचू नये 5(पान क्र. 33) अशी व्यवस्था तयार करण्यात आली वर्णव्यवस्थेत गुणकमी ऐवजी जन्मकर्मावर आली जो ज्या जातीत जन्माला आला तीच त्याची कामे समजली गेली व वर्ण व्यवस्थेतील खालील तीन वर्गाचे महत्वव अस्तित्व नाकारले गेले त्यांना विविध संस्कार पासून वंचित ठेवण्यात आले परिणामी त्याचे शोषण व पिवणूक वाढली. स्त्री कितीही गुणसंपन्न असली तरी तिचे महत्व व आस्तित्व केवळ पुरुषी व्यवस्थेवर ठेवण्यात आले त्या काळात राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात विविध सामाजिक कायदे करून महिलांच्या सक्षमीकरणाचे प्रयत्न केले महात्मा फुलेंनी शुद्रातिशूद्रांना प्राथमिक शिक्षण देण्याची मागणी केली महात्मा फुल्याच्या विचारावर पाऊल ठेवत शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला, 1971 मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत कायदा केला असे नाही तर, शिक्षणाकरीता मुले शाळेत पाठवण्याची सक्तीही त्यांच्या आई–वडीलांना करण्यात आली होती मुले शाळेत येत नसती तर प्रत्येक मूलामागे एक रुपया दर महिना दंड करण्याची तरतूद ही करण्यात आली होती (5) पान क्र (120) करवीर संस्थानात अशा 96 शाळा सुरू झाल्या होत्या व त्यात साडेचार हजाराच्या वर मुले शिकत होती. हा शिक्षणाचा खर्च निघावा समाजव्यवस्थेतील उच्चक लोकांनाही आपण शिक्षणकार्यात सहभागी आहोत असे वाटावे म्हणून 'शिक्षण पट्टी'बसवली होती पुढे त्यांचा 1918 मध्ये शिक्षण विषयककर झालेला दिसतो शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण व शाळा फक्त सुरुच केल्यानाहीत तर त्या कशा आर्थिकदृष्या सक्षम होतील हे ही पाहिले होते केले होते शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी करवीर संस्थानात प्रोत्साहन दिले संस्थानाबरोबरच भुदरगड सारख्या मागात भागात मुलींच्या शिक्षणाच्या शाळा सुरु केली मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे म्हणून शिष्यवृत्ती त्यांच्या निवासाची सोय केली होती राजाराम कॉलेजमध्ये त्यांनी मुलीचे उच्चशिक्षण देऊन कृष्णाबाई; केसरकर या वैद्यकिय अधिकारी पदापर्यत पोहचल्या होत्या राजपरिवारातून सुन इंदुमती यांच्या शिक्षणाला विरोध असतानाही शाहू महाराजानी त्यांना शिक्षण दिले व शिक्षणामुळे तुझी बुध्दी जसजशी विकसीत होईल तसतसे तुझे विचार अधिकाधिक उदात्त होत जातील म्हणून अभ्यासाची हेळसांड करु नकोस तुला सुशिक्षित विदुषी करावे अशी इच्छा असल्याचे सांगतात (8) (पान क्र. 620) शाहू महाराजांनी इंदूमती साहेबाना दिलेल्या शिक्षणामुळेच त्याच्या हातून पुढे वनिता सामाजाची महिलांच्या सक्षमीकरणासाठी उभारणी झाल्याचे दिसते तसेच महिलांचे प्रश्न मांडण्याकरीता झाल्याचे दिसते तसेच महिलांचे प्रश्न मांडण्याकरीता 'ललिताविहार' हे व्यासपीठ सुरु केले इंदूमती साहेबानी राजर्षी शाहू महाराजयांनी दिलेल्या प्रोत्साहना हे कार्य केल्याचे दिसून येते.

1977 मध्ये शाहू महाराजांनी संस्थानात विधवा पुर्नविवाहास मान्यता देणारा कायदा केला त्याच बरोबर पडदा पध्दतीचाही निषेध केलेला दिसून येता 12 जुलै 1914 मध्ये कोल्हापूर इलाख्यातील विवाहासंबंधी कायदा करून जातीनिर्बध न पाळता कोणत्याही धर्मातील व्यक्तीशी विवाह करण्याची मोकळीक दिली होती त्याच बरोबर पुरुष विवाह वय 18 व स्त्री विवाह वय 14 हा निषध ही घातक होता 18 वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची अथवा पालक संमत्तीची आवश्यकता असणार नाही (9) (पान क 113) स्त्रीला आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य, विवाह रितसर नोंदणी अशी क्रांतीकारी पाऊले शाहू महाराजानी महिला करीता घेतलेली दिसून येतात. त्यामुळे करवीर संस्थानातील स्त्रीयांना पती व त्याच्या नातलगाकडून कुरपध्दतीने वागवले जाते तिचा छळ व शोषण केला जाते म्हणून शाहू महाराजांनी 2 ऑगस्ट 1919 मध्ये क्रूरवर्तनास प्रतिबंध करणारा कायदा केला होता स्त्रीयांना जर कोणी क्रूरपणे वागवत असेल तिचा छळ करत असेल हे सिध्द झाल्यास अपराध्यास 6 महिने कारावास 7200 रूपर्यंत दंडाची शिक्षा होती. शाहू महाराजांनी घटस्फोटा संबधीचा कायदा करून स्त्रीच्या हक्कांचे संरक्षण तिच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था संततीताबा पोटगी व शिक्षण कायदे याबाबत कायदे केले होते. 'कडिमोड व जात पंचायतीचे स्त्री अन्याय करणारे निर्णय अमान्य केले होते त्या 1920 मध्ये करवीर गॅझेट मध्ये हिंदू वारसाच्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा केला होता भारतीय संविधानात नागरीकांच्या कर्तव्यापैकी एक कर्तव्य स्त्री प्रती असणाऱ्या

अनिष्ठ प्रथा नाकारणे हे भारतीय नागरीकांचे मुलभूत कर्तव्य आहे हे कर्तव्य राजर्षी शाहू महाराजांनी कित्येक वर्ष आधी पार पाडले 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्तीने स्वर्णसिंग आयोगाच्या शिफारशीव्दारे संविधानात 10 मुलभूत कर्तव्य समाविष्ठ झाली त्याच्याही कित्येक वर्ष आधी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा केला संमाजात असे कायदे करुन अनिष्ठ प्रथावर प्रहार केले होते त्यामुळे जागतीणं , मुरळी, देवदासी, भावीण प्रकाराला कायद्याने प्रतिबंध केला होता तसेच या स्त्रीयांना आईबापाच्या मिळकती वारसा हक्क दिला होता देवदासी, मुरली यांना अनिष्ठ प्रथेतून स्वतंत्र जीवन मिळावे हात त्यांचा उद्देश होता ज्या काळात ब्रिटिश स्त्रीयाबाबत कायदे करण्यात धतवत नसत त्या काळात शाहू महाराजांनी महिलासाठी केलेल कायदे क्रांतीकारी होते नव्हता तीला माणूस समजले जात नव्हते त्या काळात महिलाच्या सुधारणाची चळवळ एकट्याा राजर्षी शाहूमहाराजानी उभारली हे प्रेरणादायी भारतीय संविधानांने स्त्रीयासाठी अनेक कायदे केले प्रत्यक्षात इतके कायदे होऊनही स्त्री वरील अत्याचार थांबलेले नाहीत त्याकाळात राजर्षी शाहूचा कायदा स्त्री उधार व सक्षमीकरणाच्या दृीने मैलाचा दगड आहे शिमग्याच्या सणात स्त्रीयांविषयी बीभत्यभाषा वापरणाऱ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचा हुकूम शाहूमहाराजांनी 1921 मध्ये काढला होता (पान के 1008) शाहू महाराजांच्या काळात आंतर जातीय व आंतर धर्मीय विवाह हे शास्त्र संमन्त नसल्याने बेकायदेशीर ठरवले जाते त्यामुळे स्त्रीची खूप ससेहोलपट होत असे शाहू महाराजाची. 1919 मध्ये आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहाम् व नोंदणी पद्धतीस मान्यता देणार कायदा केला होता 17 जानेवारी 1920 मध्ये अनौरस संतती व जोगतील यांच्या विषयाचा कायदा करून अनौरस संतती पित्याच्या संपत्तीमध्ये वारसा हक्क मिळवून दिला देवदाशी जोगतिणीना यापासून परावृत्त करण्यासाठी शाहू महाराजांनी त्याचे वारसाहवक नाकारले होते स्त्रीयानी देवदासी जोगतिणीचा रस्त्यावरुन जाऊ नये हाच पुरोगामी विचार राजर्षीचा यामागे असलेला दिसून येतो.

**निष्कर्ष :**

पुरोगामी समाजसुधारक व स्त्रीस्वातंत्र्य स्त्रीहक्कांचे समर्थक शाहू महाराजानी केलेल्या विविध कायद्यामुळेच महिलांना सामाजिक दर्जा व शैक्षणिकदर्जा व स्थान प्राप्त झाले शिक्षणामूळे स्त्रीयांना आत्मसन्मान आत्मभान मिळले स्त्रीविषयक पारंपारिक रुढी परंपरा नाहिशा होऊन स्त्री समीकरणाच्या रस्यावरून पुढे जाण्यात शाहू महाराजाचे योगदान हे सर्वश्रेष्ठ आहे म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री सक्षमीकरणाच्या दृीने विविध कायदे करण्यात आले कायदे हे शाहू महाराजांचे विचार कार्य व कायदे समोर ठेवूनच झालेले दिसून येते त्यामुळे महिला सक्षमीकरणास राजर्षीचे कार्य महत्वपूर्ण आहे. शाहू महाराजानी केलेल्या कायद्यामुळेच स्त्रीला शिक्षण मिळाले विविध क्षेत्रात तीला तिची गुणवत्तेच्या आधारावर स्थान निर्माण करता आले राजर्षी शाहू महारांजाच्या पुरोगामी धोरणामुळेच ते सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते, स्त्रीयाचे उध्दारकर्ते झाले.

**संदर्भ :**

१. 'शिक्षणमहर्षी राजर्षी शाहू महाराज' – प्राचार्य रा.तु. भगत
२. राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा – डॉ. जयसिंगराव पवार
३. लोकराजा शाहू छत्रपती – डॉ. रमेश जाधव
४. शाहूंच्या आठवणी – प्रा. नानासाहेब साळुंखे